"Education through self-help is our motto."-KARMAVEER

*Rayat Shikshan Sanstha's*

# DAHIWADI COLLEGE DAHIWADI

Tal-Man, Dist- Satara 415 508, Maharashtra, India

Affiliated to Shivaji University, Kolhapur

Reaccredited by NAAC with 'A' Grade (CGPA: 3.25)

**TWO DAY INTERNATIONAL INTERDISCIPLINARY CONFERENCE**

**on**

**Recent Trends & Issues in Social Sciences & Commerce (RTISC19)**

**Organised by**

**Department of Economics, History, Political Science & Commerce**

## Certificate

रयत शिक्षण संस्था, सातारा 1919-2019

This is to certify that प्रा. नागमेश यादवराव खंदिवे

of अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर participated in International Interdisciplinary Conference on Recent Trends & Issues in Social Sciences & Commerce (RTISC19) organized on 19th and 20th December, 2019 at Dahiwadi College Dahiwadi and chaired a session / worked as a Resource Person / presented a research paper entitled समकालीन जागतिक व्यवस्था व भारताचे परराष्ट्र धोरण.



शताब्दी महोत्सव

| | | |
|---|---|---|
| Dr. B.S. Balwant<br>Coordinator | Dr. A.N. Dadas<br>Convener | Prin. Dr. B.T. Jadhav<br>President |

Scanned with OKEN Scanner

# समकालीन जागतीक व्यवस्था व भारताचे परराष्ट्र धोरण

प्रा.रणदिवे टी. वाय.

राज्यशास्त्र विभाग
अण्णासाहेब आवटे कॉलेज,मंचर.

**प्रस्तावना:**

समकालीन युग हे जागतिकीकरणाचे युग आहे त्यामुळे या काळात कोणतेही राष्ट्र स्वत:ला वैश्विक प्रक्रियेपासून अलिप्त ठेवू शकत नाही. प्रत्येक राष्ट्राला आपले राष्ट्रीय हित साध्य करण्यासाठी परस्परांवर अवलंबून राहावे लागते आणि ते साध्य करण्यासाठी उत्तम परराष्ट्र धोरणाची निकड भासते. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा विकास हा स्वातंत्र्यपूर्व काळापासून घडत आलेला आहे. अध्ययनाच्या दृष्टीने आपण त्याचे तीन टप्प्यांमध्ये विभाजन करु शकतो. प्रारंभीचे परराष्ट्र धोरण हे पं. नेहरू यांच्या नेतृत्वात आकाराला आले. ज्यामध्ये लोकशाही, सर्वधर्मसमभाव, उदारमतवाद, विचारस्वातंत्र्य, मिश्र अर्थव्यवस्था आणि साम्राज्यवादविरोधी व अलिप्ततावादावर भर देणारे होते. पं. नेहरूंनी कटाक्षाने दोन्ही महासत्तांपासून अंतर ठेवले होते. भारताचे परराष्ट्र धोरण सन १९९१ पर्यंत स्थिर राहिले मात्र तदनंतर भारतीय परराष्ट्रीय धोरणाचे स्वरुप व उद्दिष्टे यामध्ये अनेक स्थित्यंतरे घडून आलेली दिसतात. नजीकच्या काळात जागतिक रंगमंचावर भारताची प्रतिमा प्रभावी राष्ट्र म्हणून उदयाला येताना दिसते. भारताचे विद्यमान पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी हे परराष्ट्र धोरणावर अधिकाधिक भर देत असून भारताचा राजकीय, आर्थिक विकास साधण्यासाठी परराष्ट्र धोरणाचा एक साधन म्हणून उपयोग करत आहे. प्रस्तुत शोधनिबंधात समकालीन जागतिक व्यवस्थेत भारताच्या परराष्ट्र धोरणाचे बदलते स्वरुप व आव्हाने यांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**समकालीन जागतिक व्यवस्था व भारताचे परराष्ट्र धोरण:**

जागतिक राजकारणाच्या दृष्टीने १९९१ हे वर्ष अनेक अर्थांनी महत्वपूर्ण आहे. शीतयुद्धाचा अंत, सोव्हियत संघाचा विघटन, जागतिक राजकारणात एककेंद्री नेतृत्व, विचारप्रणालीचा अंत, आर्थिक एकीकरणाची प्रकिया, लोकशाहीचा प्रसार या सगळया घटनांचा जागतिक राजकारणाला प्रभावित केले.या सगळया घटनांचा प्रभाव भारताच्या परराष्ट्र धोरणावर होउन त्याचे स्वरुप बदलत गेले.

**समाजवाद ते भांडवलवाद:**

१९९१ नंतर भारतीय अर्थव्यवस्था मुक्त होण्यास सुरुवात झाली. यामध्ये प्रथमत: परराष्ट्रीय धोरणाचा वापर राजकीय धोरणांपेक्षा आर्थिक हितसंबंधाना महत्व देण्यात आले व तत्वप्रणाली धुसर होउन तिची जागा हितसंबंधानी घेतली. खरतर या काळात समाजवादी विचारांची पिछेहाट झाली व भारताचे परराष्ट्र धोरण भांडवलवादाकडे मार्गस्थ व्हावयास सुरुवात झाली. शीतयुद्धोत्तर काळात भारताचे परराष्ट्र धोरण केवळ पश्चिमी राष्ट्रांकडेच आपल्या आर्थिक, व्यापारी व संरक्षण साधण्यासाठी प्रयत्न केला जायचा मात्र तदनंतर भारताने लुक ईस्ट पॉलिसी सुरु केली.

**संवादपर्व:**

१९९६ मध्ये भारताच्या इतिहासामध्ये प्रथमरित्या परराष्ट्र धोरणाचे सैद्धांतिकरण करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने शेजारील राष्ट्रांशी संबंध सुधारण्यावर भर देण्यात आला. मुख्यत: या काळात भारत व पाकिस्तान

Copyright ©authors



Scanned with OKEN Scanner

ISSN 2277-2359
Vol-12-Issue-03
March 2020

उभय देशांमध्ये संबंध सुधारण्यासाठी संवादपर्व सुरु झाला. भारताने तुर्तास काश्मीर प्रश्न बाजूला सारुन सांस्कृतिक, शैक्षणिक, व्यापार इ. क्षेत्रात सहकार्य करण्यास सुरुवात केली.

या काळात भारताचे परराष्ट्र धोरण शेजारील राष्ट्रांशीसंबंध सुधारुन आर्थिक सहकार्य स्थापित करणे हा होता. शेजारील राष्ट्रांशी विवीध क्षेत्रात सहकार्य प्राप्त करुन भारताविषयी भीती वाटत होती तिची जागा आता विश्वासनिर्मीतीच्या प्रक्रियेनी झाला.

**आदर्शवाद ते वास्तववाद:**

जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारल्यानंतर भारताचे परराष्ट्रीय धोरण मुलत: बदलून गेले. प्रथमत: भारतीय परराष्ट्र धोरणावरुन नेहरुंचा प्रभाव कमी होण्यास सुरुवात झाली आणि त्याची जागा वास्तववादाने घेतली. १९९८ च्याकाळात भारतान अण्वस्त्रधारी राष्ट्र म्हणून घोषित केले. सामरिक युती आकाराला आली. अमेरिकेशी संबंध विकसीत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याचबरोबर भारताने अणू परीक्षणाचा हेतू स्पष्ट केला.

**सकारात्मक व नकारात्मक प्रवाह:**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेनंतर भारताच्या परराष्ट्र धोरणात काही अंशी सकारात्मक व नकारात्मक प्रवाह बघायला मिळतात. एकीकडे भारत अमेरिका संबंध विकसीत करुन उभय देशांमध्ये नागरी अणुकरार कसा प्रत्यक्षात येईल यावर भर देण्याचा प्रयत्न केला गेला तर दुस—या बाजूला केंद्रात सहभागी असणारी घटक पक्षांनी डोके वर करण्यास सुरुवात केली. (उदा. भारत श्रीलंका संबंध) त्याचबरोबर मुंबईवर झालेला दहशतवादी हल्ला ही घटना महत्वपूर्ण ठरली. चीनने याचा लाभ घेत आपला प्रभाव दक्षिण आशियात रोवण्यास सुरुवात केली. परिणामत: भारताच्या परराष्ट्र धोरणाला एक प्रकारचा सेट बॅक बसला.

**'मोदी'युग व भारताचे परराष्ट्र धोरण:**

**आर्थीक विकास:**

सन २०१४ मध्ये केंद्रात सत्तांतर घडले व नरेंद्र मोदी यांचे स्पष्ट बहुमत असणारे सरकार सत्तेत आले. नरेंद्र मोदी यांनी परराष्ट्र धोरणामध्ये आर्थिक विकासाला प्राधान्य दिले आहे. यांनी आर्थिक विकासाला प्राधान्य देत रोजगार निमीर्तीसाठी उत्पादन निर्मीतीच्या क्षेत्रावर भर देण्यास सुरुवात केली. त्याचबरोबर परदेशी गुंतवणुकीला आकर्षित करणे, परदेशी भांडवल व तंत्रज्ञानावर भर, आरोग्य क्षेत्रावर भर दिला जात आहे.

**संरक्षण सिद्धता:**

भारताची अंतर्गत सुरक्षा ही भारताच्या शेजारील राष्ट्रांमधील शांतता, तेथील लोकशाहीचे अस्तित्व, राजकीय स्थैर्य यावर अवलंबून असते हे नरेंद्र मोदींनी अचूक हेरले आहे. व राष्ट्रीय सुरक्षेशी निगडीत हितसंबंध राखण्याचा प्रयत्न केला जात आहे. पाकिस्तान किंवा चीनशी सहकार्य करताना भारताच्या सुरक्षेचा बळी दिला जाणार नाही, हे मोदींनी स्पष्ट केले. उदा. नजीकच्या काळातील सर्जीकल स्ट्राईक.

**ॲक्ट ईस्ट पॉलिसी:**



Scanned with OKEN Scanner

पंतप्रधान यांनी परराष्ट्र धोरणामध्ये दक्षिण पूर्व आशियायी देशांशी असलेल्या संबंधाना विशेष महत्व दिले आहे. या पार्श्वभूमीवर सत्तेत आल्यानंतर पहिल्या शंभर दिवसांमध्ये त्यांनी नेपाळ, भूतान, जपान आदी राष्ट्रांना भेटी दिल्या. पूर्वीच्या पूर्वेकडे पहा धोरणांऐवजी **ॲक्ट ईस्ट** धोरण स्विकारले.

**नेबरहुड फर्स्ट:**

भारताने शेजारील राष्ट्रांशी संबंध घनिष्ट करण्यावर भर देण्यात आले. यामध्ये प्रामख्याने सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक, व्यापारविषयक सबंध स्थापित करण्यावर प्राधान्य दिले जात आहे.

**भारताच्या परराष्ट्र धोरणांपुढील आव्हाने:**

१. आपल्या देशाची एकात्म राष्ट्र म्हणून व त्याच्या सीमांतर्गत भूप्रदेशाची सुरक्षितता राखणे.
२. चीनच्या आक्रमक विस्तारवादी धोरणाला पायबंद घालणे.
३. दहशतवाद या गंभीर वैश्विक समस्येविषयी लढण्यासाठी अन्य राष्ट्रांशी सहकार्य प्रस्थापित करणे.
४. पाकिस्तानशी वाटाघाटी करताना संघर्षग्रस्त मुद्दे बाजूला सारुन अन्य स्तरावर सहकार्य वाढविणे.
५. भारत आर्थिकदृष्टया समृद्ध व बलवान होण्यासाठी प्रयत्न करणे.
६. अमेरिकेशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करणे.

**निष्कर्ष:**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला आजमितीस २८ वर्षे पूर्ण झाली आहेत. या स्तरावर भारताचे परराष्ट्र धोरण आकाराला आले. परराष्ट्र धोरणात आर्थिक व व्यापारी राजनयाचे महत्व वाढले. त्याचबरोबर अनेक नव्या आंतरराष्ट्रीय व प्रादेशीक संस्था व संघटनांमुळे बहुपक्षीय राजनयाला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. दावोसमध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या बैठकीत चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी महत्वपूर्ण विधान केले, 'व्यापार युद्वात कुणीच विजयी होत नाही'. याचाच अर्थ पुढील काळात भारताचे परराष्ट्र धोरण आखताना चीनच्या जागतिक वर्चस्वासाठी चाललेली घोडदौड नीटपणे तपासून घेतली पाहिजे व 'ब्रेक्झिट'चाही भारताच्या व्यापारविषयक धोरणावर कितपत प्रभाव राहील याचाही अंदाज घेतला पाहिजे. २०१७–१८ पासून समकालीन जागतिक व्यवस्थेत पुन्हा मोठे बदल होताना दिसतात. त्याचबरोबर अमेरिकेत झालेला डोनाल्ड ट्रम्पचा उदय हा भारतीय परराष्ट्रीय धोरणाशी कितपत अनुकूल असेल? भारताच्या परराष्ट्र धोरणातील महत्वाची क्षेत्रे म्हणजे पाकिस्तान, अमेरिका, चीन, रशिया आणि इतर शेजारी राष्ट्रे यांना भारत कसा तोंड देतो हे येणारा काळच ठरवेल.

**संदर्भ:**


१. डॉ. देवळाणकर, शैलेंद्र (२००७): भारतीय परराष्ट्र धोरण: सातत्य व स्थित्यंतर, प्रतिमा प्रकाशन, पुणे. पृ. २९–३३.
२. डॉ. देवळाणकर, शैलेंद्र (२०१५): भारत आणि जग भारताचे परराष्ट्र धोरण आणि सुरक्षा संबंध, सकाळ प्रकाशन, पुणे. पृ. १२–१७.
३. मोरखंडीकर, राघवेंद्र(२०१०): भारताच्या शीतयुद्धोत्तर परराष्ट्र धोरणाचे आंतरराष्ट्रीय संदर्भ, (भारत आणि आंतरराष्ट्रीय भू–राजकारण), समाजप्रबोधन पत्रिका आणि सेंटर फॉर स्टडी कल्चर ॲड सोसायटी,निवडक समाज प्रबोधन पत्रिका खंड २,लोकवाङ:मय गृह, मुंबई. पृ. १–११
४. पेंडसे, अरुणा व सहस्त्रबुध्दे, उत्तरा (२००८): आंतरराष्ट्रीय संबंध शीतयुद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण, ओरिएंट ब्लॅक स्वान प्रायव्हेट लिमीटेड,मुंबई. पृ. ५१–५६.


Copyright©authors



Scanned with OKEN Scanner